आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१० एप्रिल २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- तेलंगणात काही प्रमुख नेत्यांसह ४२ माओवाद्यांचं आत्मसमर्पण

- विधानसभा निवडणुकीसाठी आसाममधे सुमारे ८६, तर पुदुचेरीमधे सुमारे ९०  टक्के अशी विक्रमी मतदानाची नोंद

- वादग्रस्त न्यायमूर्ती  यशवंत वर्मा यांचा पदाचा राजीनामा

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आठ खासदार फुटून शिवसेनेत येणार असल्याचं वृत्त एकनाथ शिंदे यांनी फेटाळलं

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ९१८ अंकांची वाढ

**<><><><><>**

तेलंगणात आज माओवाद्यांच्या काही प्रमुख नेत्यांसह ४२ माओवाद्यांनी पोलिसांपुढं आत्मसमर्पण केलं. त्यांच्यात पीएलजीएचा बटालियन कमांडर सोडी मल्ला उर्फ केशल उर्फ निकी, जेएमएमडब्लूपीच्या राज्य समितीचा सदस्य चापानारायण उर्फ गजेंद्र उर्फ मधू, आणि बीव्हीपी सदस्य काडतीसंधू उर्फ मंतू यांचा समावेश आहे. यावेळी त्यांनी शस्त्रास्त्रांचा मोठा साठा आणि ८०० ग्रॅम सोनं पोलिसांकडे सुपुर्द केलं.

**<><><><><>**

पुदुचेरी, आसाम आणि केरळमधे  विधानसभा निवडणुकांसाठी काल झालेल्या मतदानाची अधिकृत आकडेवारी निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे. त्यानुसार आसाममधे ८५ पूर्णांक ९१ शतांश टक्के तर पुदुचेरीमधे ८९ पूर्णांक ८७ शतांश टक्के अशी विक्रमी मतदानाची नोंद झाली आहे. केरळात ७८ पूर्णांक २७ शतांश टक्के मतदारांनी मतदान केलं. या तिन्ही ठिकाणी महिलांनी केलेल्या मतदानाची टक्केवारी देखील विक्रमी आहे. आसाममधे साडे८६  टक्के, केरळात ८१ पूर्णांक १९ शतांश टक्के तर पुदुचेरीत ९१ पूर्णांक ४ दशांश टक्के महिला मतदारांनी आपली पसंती मतयंत्रावर नोंदवली.

**<><><><><>**

तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी विविध राजकीय पक्षाचे वरिष्ठ नेते प्रचारसभा घेत असल्यानं या दोन्ही राज्यांमध्ये प्रचाराला चांगलाच वेग आला आहे. तमिळनाडूच्या सर्व मतदारसंघात येत्या २३ एप्रिलला मतदान होईल.

**<><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षादरम्यान वीज आणि ऊर्जेची मागणी टिपेला पोहोचली असतानाही ती यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली, असं केंद्र सरकारने म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित आंतरमंत्रालयीन बैठकीत ऊर्जा मंत्रालयाचे सचिव पियुष सिंग यांनी सांगितलं, की देशातल्या सर्व औष्णिक वीज प्रकल्पांमधे कोळशाचा पुरेसा  साठा असून ते पूर्ण क्षमतेनं काम करत आहेत. येत्या ३ महिन्यात औष्णिक, सौर, पवन आणि जलविद्युत प्रकल्पांची एकत्रित क्षमता  २२ हजार मेगा वॅट्सपर्यंत नेण्याची सरकारची योजना आहे. देशात घरगुती वापराचा एलपीजी आणि इंधनाचा पुरवठा स्थिर असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी सांगितलं.

**होल्ड - बाईट - सुजाता शर्मा**

पश्चिम आशियातल्या घडामोडींवर सरकारचं बारकाईनं लक्ष असून ऊर्जा पुरवठ्याच्या दृष्टीनं विविध मंत्री आखाती देशांचे दौरे करत आहेत असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं.

**<><><><>**

वादग्रस्त न्यायमूर्ती  यशवंत वर्मा यांनी आज पदाचा राजीनामा दिला. अलाहाबाद न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून काम करत असताना वर्मा यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात जळालेल्या नोटा आढळल्याप्रकरणी त्यांच्यावर महाभियोग चालवण्यात येत होता. राजीनाम्यासाठी वेगळं कारण न देता, आपण अतिशय शोकसंतापाने पदाचा राजीनामा देत असल्याचं त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना उद्देशून लिहीलेल्या राजीनामापत्रात म्हटलं आहे.

**<><><><>**

१९वा मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव- मिफ येत्या १५ ते २१ जून दरम्यान मुंबईच्या एनएफडीसी संकुलात होणार आहे.  माहितीपट, लघुपट आणि ॲनिमशन अशा ३ प्रकारचे चित्रपट जगभरातून या महोत्सवात सादर  होतात. सहभाग नोंदवण्यासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत येत्या रविवारपर्यंत म्हणजेच १२ एप्रिलपर्यंत आहे. अधिक माहिती

**https://filmfreeway.com/ MumbaiInternational FilmFestival-MIF**F या मंचावर उपलब्ध आहे.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ८ खासदार फुटून शिवसेनेत येणार असल्याचं वृत्त शिवसेनेनं फेटाळलं आहे. ठाकरे गटाच्या खासदारांसोबत झालेल्या कथित बैठकीचं वृत्त पूर्णपणे निराधार, खोडसाळ आणि गैरसमज निर्माण करणारं असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत बोलत होते. अशी कोणतीही बैठक झालेली नाही, त्यामुळे माध्यमांनी अशा बातम्या देणं टाळलं पाहिजे असंही शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ९१८ अंकांची वाढ झाली आणि तो ७७ हजार ५५० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २७५ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ५१ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आगामी गगनयान मोहिमेसाठी दुसरी एकात्मिक एअर ड्रॉप चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली. आंध्र प्रदेशातल्या श्रीहरीकोटा इथं ही चाचणी करण्यात आली. अंतराळवीर ज्या कॅप्सूलमध्ये बसतात, तिला पृथ्वीच्या आवरणात पुन्हा प्रवेश करता यावा आणि सुखरूप उतरता यावं, यादृष्टीनं ही चाचणी महत्त्वपूर्ण मानली जाते.

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी या यशस्वी चाचणीबद्दल इसरोचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालविधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीचा जाहीरनामा आज ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी प्रसिद्ध केला. संकल्प पत्र नावानं प्रकाशित या घोषणापत्रात महिला, युवावर्ग आणि सरकारी कर्मचाऱ्यांना मोठी आश्वासनं दिली आहेत.

**<><><><><>**

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. राज्यसभेचे अध्यक्ष उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली. रालोआ तर्फे येत्या १४ तारखेला बिहारच्या नवीन मुख्यमंत्र्यांची निवड होण्याची शक्यता आहे.

राज्यसभेचे मावळते उपाध्यक्ष हरिवंश यांनीही आज राज्यसभेचे सदस्य म्हणून शपथ घेतली. माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई राज्यसभेतून निवृत्त झाल्यानंतर रिकाम्या झालेल्या जागेवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी हरिवंश यांची नियुक्ती केली आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेशात मथुरा जिल्ह्यात यमुना नदीत एक नाव बुडून सहा जणांचा मृत्यू झाला. लुधियानाहून आलेले ३० यात्रेकरु दोन नावांमधून निघाले असताना त्यातली एक बोट बुडाली. आतापर्यंत सहा मृतदेह सापडले असून शोध आणि मदत कार्य सुरू आहे, असं मथुरेच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

भारताच्या परकीय चलन साठ्यात ९ अब्ज रुपयांची लक्षणीय वाढ झाली असून गेल्या ३ एप्रिलपर्यंत तो ६९७ अब्ज १२१ कोटी रुपयांवर पोचला आहे. त्यामुळं मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात परकीय चलन साठ्यात झालेली घट एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात भरून निघाली आहे. या कालावधीत सोन्याच्या साठ्यात ७ अब्ज २२१ कोटी रुपयांची, तर परकीय चलन संपत्तीत १ अब्ज ७८४ कोटी रुपयांची वाढ झाल्यानं परकीय चलन साठ्याच्या वाढीला चालना मिळाल्याचं रिझर्व बँकेनं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

'महावीर चक्र' विजेते निवृत्त कर्नल सोनम वांगचुक यांच्या निधनाबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शोक व्यक्त केला आहे. १९९९ च्या कारगिल युद्धात सोनम वांगचुक यांचा महत्वाचा सहभाग होता. कर्नल वांगचुक यांचे जीवन हे शौर्य, त्याग आणि राष्ट्रीय एकात्मतेचे एक ज्वलंत उदाहरण आहे. त्यांचा वारसा येणाऱ्या पिढ्यांना सतत प्रेरणा देत राहील, असं राजनाथ सिंह यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज गुवाहाटी इथं होणार असलेला, राजस्थान रॉयल्स आणि रॉयल्स चॅलेंजर्स बेंगळुरु यांच्यातला सामना पावसामुळे मैदान ओलं असल्यानं अद्याप सुरु होऊ शकलेला नाही. संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होणार होता. मात्र पावसामुळे अद्याप नाणेफेकही झालेली नाही..

<><><><><>

मंगोलियात उलानबातार इथं झालेल्या आशियाई बॉक्सिंग स्पर्धेत भारतानं पाच सुवर्ण, तीन रौप्य आणि आठ कांस्य पदकांसह एकूण १६ पदकांची कमाई करत आपल्या मोहिमेची सांगता केली.

//<><><><><>//